स्वरभूषण

वसंत देसाई

प्रा. दि. ग. नाईक • गुं. फ. आजगावकर



महाराष्ट्र भाषा भूषण **ज. र. आजगांवकर**

जन्म १६ ऑगष्ट १८७८ मृत्यु २७ ऑगष्ट १९५५

'प्राचीन मराठी संतकवि' ह्या बहुमोल ग्रंथाचे लेखक, संतसेवक महाराष्ट्र भाषाभूषण **जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर** यांच्या पवित्र स्मृतीस कै. स्वरभूषण **वसंत देसाई** यांचे स्मृतिपुष्प सादर समर्पण

— गुं. फ. आजगांवकर

मुखपृष्ठ : य. शं. सामंत, जी. डी. आर्ट, मुंबई

स्वर भूषण–

वसंत देसाई

लेखक :

प्राचार्य **दि. ग. नाईक**

गुं. फ. आजगांवकर

संपादन :

गुं. फ. आजगांवकर

३३६/२ भाईजीवन लेन

मुंबई ४०० ००२

मुद्रक :
उदय चिंतामण जोशी
स्वानंद मुद्रणालय
अलिबाग–कुलाबा

© सर्व हक्क सुरक्षित
१९७६

किंमत १ रुपया

प्रकाशक :
संतोष गुंफराज आजगांवकर
कोंकण मराठी डायलेक्ट्स् रिसर्च इन्स्टिट्यूट
२५ के. बी. निवास
मुंबई ४०० ००४

घनश्याम सुंदरा

घनश्याम सुंदरा श्रीधरा अरुण उदय झाला
उठि लौकरि वनमाळी उदयाचली मित्र आला ।।धृ।।
सायंकाळी एकेमेळी द्विजगण अवघे वृक्षी
अरुण उदय होताचि उडाले चरावया पक्षी ।।
अघमर्षणादि करुनि तापसी तपाचरणी दक्षी
प्रभातकाळी उठूनि कापडी तीर्थपंथ लक्षी ।।
करुनि सडासंमार्जन गोपी कुंभ घेउनि कुक्षी
यमुनाजळासि जाति मुकुंदा दध्योदन भक्षी ।।
मुक्तता होउ पाहे कमळणीपासुनी भ्रमरा
पूर्व दिशे मुख धुतले होतसे नाश तिमिरा ।।
उठ लौकरि गोविंदा सावळ्या नंदकुमारा
मुख प्रक्षालन करी अंगीकारी भाकरकाला ।।
उठि लौकरि वनमाळी उदयाचली मित्र आला !

संगीत : **वसंत देसाई**

कहाणी एका अमर कलाकाराची !

●

प्रा. दि. ग. नाईक

सोमवार दिनांक बावीस डिसेंबर १९७५. संध्याकाळची वेळ. विख्यात संगीतकार पद्मश्री वसंतराव देसाई कालवश झाले. काही वर्षांमागे श्रीमान् मोतीरामशेट देसाई टोपीवाले आणि वसंतराव यांची योगायोगाने गाठ पडली. ऋणानुबंधाने पडलेली ती गाठ यथाकाल एवढी दृढ झाली की, वसंतराव मोतीरामशेटकडे वडील बंधूप्रमाणे त्यांच्याच घरी राहू लागले. प्रकृती अस्वास्थ्यामुळे शेट काही दिवस रुग्णालयात होते. वसंतरावांच्या मृत्यूच्या दिवशीच रुग्णालयातून पेडर रोडवरील केंब्रिज कोर्टमधील आपल्या निवासस्थानी ते परत आले. लिफ्ट नादुरुस्त असल्यामुळे तिसऱ्या मजल्यावरील त्यांच्या राहात्या जागेत त्यांना खुर्चीवरून नेण्यात आले. आपल्या जागेत जाऊन अर्धा पाऊण तास झाला असेल नसेल तोच वसंतराव खाली लिफ्टमध्ये चेंगरल्याची धक्कादायक वार्ता त्यांना समजली. ते स्वत: तर जाग्यावरून उठू शकत नव्हते. त्यांचा मुलगा विकास, सुदैवाने घरी होता. तो धावतच खाली गेला. आपल्या लाडक्या वसंतकाकांना वाचविण्यासाठी त्याने आकाशपाताळ एक केले असते, पण विकासचा हात लागण्यापूर्वीच सर्व कारभार आटोपला होता.

वसंतरावांच्या अंत्यदर्शनाला जाण्याचा धीर मला झाला नाही. मोतीरामशेटनाही कसे भेटावे, केव्हा भेटावे अशा विचारात दिवस असे तसेच गेले आणि अचानक गुं. फ. आजगांवकर आले. शेटकडे जाऊ या म्हणाले आणि तात्काळ आम्ही दोघे केंब्रिज कोर्टाच्या पायथ्याशी जाऊन पोहोचलो. आडव्या तिडव्या फळ्या मारलेली, विच्छिन्न, विद्रूप लिफ्ट पाहून अंगावर काटा आला. ह्याच लिफ्टमध्ये वसंतरावांना प्राणांतिक अपघात झाला हे आठवून काळजात चर्र झाले. दरवाज्यावर लाल अक्षरात धोक्याची सूचना लिहिली

होती. ती न्याहाळीत जड अंतःकरणाने जिने चढून वर गेलो. घरात पाऊल टाकताच वसंतरावांच्या अस्तित्वाचा अभाव तीव्रतेने जाणवला. मोतीरामशेट म्हणाले की, वसंतरावांना आपल्या मृत्यूची चाहूल लागली असावी. गेले कित्येक दिवस ते त्याबद्दल बोलत होते. १९७६ साल आपण पाहाणार नाही असे म्हणत होते. त्यांचा मोठा बंधू अच्युतराव कुडाळला गंभीर आजारी असल्यामुळे वेळात वेळ काढून त्याला भेटून येण्याचे वसंतरावांनी ठरविले होते. कामाच्या धाईगर्दीत एक दिवस मोफत जाणार होता. तरीही त्यांनी कुडाळला जाऊन येण्यासाठी टॅक्सी ठरविण्यास सांगितले. पण नंतर लगेच म्हणाले, ' टॅक्सी ठरवू नका, माझी आणि अच्युतरावांची भेट होणार नाही. माझे थोडे दिवस उरले आहेत. हातात घेतलेली कामे मला पुरी केली पाहिजेत ! '

वसंतरावांच्या ह्या सूचक बोलण्याचा अर्थ इतरांना कसा लागावा ? त्रेसष्ट वर्षांचे वय होते तरी त्यांची पन्नाशी झाली असेल असे कोणाला वाटत नसे. एखाद्या तरुण कुस्तीगिराला लाजवील अशी त्यांची पिळदार शरीरयष्टी होती. रुंद छाती आणि भरलेली गर्दन. त्यांच्या गोबऱ्या गोबऱ्या गालावर सुरकुती नावालाही नव्हती. प्रत्यक्ष उत्साहाने लाजावे असा त्यांचा उत्साह होता. त्यांच्या जिद्दीला हद्द माहीत नव्हती. अंतरंगातील संगीताने मोहरलेली मुद्रा आणि सदैव पुढे जाण्याचा पवित्रा ! मग अगदी जवळून पाहाणारालाही ते तरुण वाटले तर नवल काय ! वसंतरावांचे एक जिवाभावाचे स्नेही कविवर्य ग. दि. माडगूळकर यांनाही परवा परवापर्यंत वसंतरावांच्या खऱ्या वयाचा पत्ता नव्हता.

मग अशा ह्या वसंताचा अंत अगदी जवळ येऊन ठेपला आहे अशी कोणाला शंका तरी कशी येईल ? मरणाबद्दलचे त्यांचे सूचक बोलणे कोणी मनावर घेतले नाही यात नवल नाही. वसंतरावांसारख्या निर्व्यसनी, अंतरबाह्य निरोगी, बलदंड माणसाला मृत्यू झाला तरी कसा आणि कोठे गाठणार ? असामान्य कर्तबगारीचे वसंतराव एखाद्या सामान्य माणसाप्रमाणे कालवश कसे होतील ? मृत्यू वसंतरावांवर झडप घालण्यासाठी टपलेला असावा. अखेर वसंतरावांवर आपले पाश टाकण्यासाठी त्याला मोडक्या विजेरी साप-ळ्याचे साहाय्य घ्यावे लागले. तसे पाहता वसंतराव फार जागरूक माणूस

होते. लिफ्ट नादुरुस्त आहे अशी नुसती शंका आली तरी त्याकडे ते कधी फिरकत नसत. दुसऱ्यांना फिरकू देत नसत. धाडधाड जिने चढून जाण्याचे त्यांना काही वाटत नसे. मग त्या दिवशी नादुरुस्त असलेल्या लिफ्टमध्ये वसंतराव पाय ठेवतात याचा अर्थ काय? अर्थ एकच दिसतो, जो मृत्यू आपल्या अवतीभवती वावरताना त्यांना दिसला होता, तोच मृत्यू त्यांना त्या सायंकाळी त्या लिफ्टमध्ये दिसला.

मृत्यूला पाहून वसंतराव मागे सरले नाहीत. त्यांनी मृत्यूच्या मस्तकावर पाय दिला. त्यांना विरोचित मरण आले. त्यांच्या मरणाची त्यांच्या आप्तेष्टात जी प्रतिक्रिया झाली ती वर्णनातीत आहे. विराट स्मशान यात्रा, फाटलेल्या हृदयांचे हंबरडे, अश्रूंचे पूर, पुष्पांजली, श्रद्धांजली, हे सर्व पाहिल्यावर मृत्यूने वसंतरावांना आड वाटेने नेण्यात काय साधले ते समजत नाही. आपला मृत्यू जवळ आला तर त्याला चुकविण्याचा प्रयत्न न करता सामोरे जाण्यातच पुरुषार्थ आहे असा तर या चित्तथरारक घटनेचा अर्थ नसेल ना? कर्तव्यनिष्ठ माणूस मरणाने मरत नसतो. वसंतरावांनी आजन्म मनोभावे संगीताची सेवा केली. त्यांनी संगीत प्रतिष्ठानची कल्पना रुजत घातली आहे. त्यांच्या आकस्मिक निधनाने अनेकांची अंतःकरणे हेलावली आहेत. त्यांच्या संकल्पित कार्याला मूर्तस्वरूप येण्यास आता विलंब लागणार नाही. वसंतरावांचा स्मृतीसुगंध आता लक्ष लक्ष हृदयांतून दरवळणार आहे. त्यांच्या अमर जीवनास सुरुवात झाली आहे. वसंतरावांना अमर करून त्या दिवशी सायंकाळी केंब्रिज कोर्टाच्या लिफ्टमध्ये त्यांचे मरण मरून गेले.

तथापी ज्यांच्या मृत्युमुळे असंख्य मने हळहळली, हृदये दुभंगली, सिनेमासृष्टी थरारली ते यशवंत, जयवंत, गुणवंत वसंतराव काही आकाशातून अवनीतलावर अवतरले नव्हते. नदीच्या उगमाप्रमाणे अज्ञात अशा कोकणातील एका आडवळणी खेड्यात त्यांच्या जीवनास सुरुवात झाली. कोकणच्या लाल मातीचा एक गुण आहे. शुन्यातून सुरुवात करून यशाचे शिखर गाठणारी नररत्ने ह्या मातीत वारंवार निर्माण होत आली आहेत. वयाच्या आठव्या वर्षी पित्याचे छत्र हरपल्यामुळे वेतोऱ्याच्या रानात आजोळची गुरे चारणारा रुद्राजी आजगांवकर, बागलांच्या राईचा मठ संस्थापक, परमयोग

संपन्न श्रीमद् चिदानंद स्वामी झाला. अठराविश्वे दारिद्र्याने पोळलेला, अन्नासाठी दाहीदिशा फिरणारा अनंत देसाई (वालावलकर) मुंबई महानगरातील व्यापाऱ्यांचा शिरोमणी, दानशूरांचा अग्रणी, श्रीमान् रावबहादूर अनंत शिवाजी देसाई टोपीवाले झाला. तद्वतच सोनावड्याच्या माळावर भजनी गायकीच्या लकेऱ्या मारीत फिरणारा खेडवळ वसंत, विख्यात संगीत दिग्दर्शक, भारत पद्मश्री वसंतराव देसाई झाला.

सोनावडेकर देसाई घराण्याचा संस्थापक व वसंतराव देसायांचा पूर्वज दादाजी नारायण तथा दादबा देसाई इ. स. ८०० च्या सुमारास परुळ्यातील मांजर्डेकर देसाई घराण्याचा प्रमुख होता. तो कुडाळच्या राज्यदरबारी मानकरी होता. एकदा घोड्यावरून रपेट करता करता कुडाळ राजधानीच्या उत्तरेस चार पाच मैलावर एका जंगलवजा गावात आला. कर्ली नदीकाठच्या मळ्यानी आणि चारदोन तळ्यानी युक्त अशा त्या गावाला 'स्वर्णवट' असे नाव होते. त्याचेच होता होता सुवर्णवट, सुवर्णवड, सोनवड आणि शेवटी सोनावडे झाले. सोनावड्याचा निसर्गरम्य परिसर पाहून दादबा हरखून गेले. नवीन वसाहत करावी तर इथेच, असे त्यांना तीव्रतेने वाटू लागले. त्या दृष्टीने त्यांनी शोध घेतला. गावात फक्त महार लोकांचीच वस्ती होती. बिडाच्या मातीच्या खाणीशिवाय नाव घेण्यासारखे दुसरे काही तेथे नव्हते. बिडाची भांडी बनविण्यात सोनावडेकर महार वाकबगार होते. दादबांनी गाव वसविण्याचे निश्चित केले.

दादबा राज्याधिकारी होते तरी सोनावडे गाव तेथील महारांच्या मालकीचा होता. 'काळी' म्हारीण त्यांची प्रमुख होती. ती सोनावड्याची गावकरीण होती. दादबांच्या व तिच्या मुलाखती झाल्या. दादबांच्या रुबाबदार, लोभस व्यक्तिमत्त्वाचा काळीवर प्रभाव पडला. तिने सोनावडे गाव दादबांना अर्पण केला. दादबांनी मोठ्या कल्पकतेने गाव वसविला. महारांना गावकीमध्ये योग्य स्थान दिले. देसायांचा भव्य वाडा बांधला. कर्मधर्मसंयोगाने याच सुमारास कुडाळदेशकर गौड ब्राह्मणांच्या शंकराचार्य पीठाचे संस्थापक श्रीमद् विद्यापूर्णानंदस्वामी आचार्य मठ स्थापनेसाठी योग्य अशा स्थानाच्या शोधात होते. विकास कार्यात सदैव आघाडीवर असलेल्या दादबांनी आपल्या वाड्यानजीकच मठासाठी प्रशस्त जागा दिली. मठ स्थापनेच्या कामात जातीने

लक्ष घालून सर्व व्यवस्था नीट बांधून दिली. मठाच्या स्वास्थ्यासाठी त्यांनी जमिनी तोडून दिल्या. अशा तऱ्हेने मठाची स्थावर-जंगम मालमत्ता ही दादबा देसायांनी मठाला दिलेली उदार देणगी होती. त्यामुळे आजतागायत दादबांचे वंशज त्या मठाचे व्यवस्थापक व मानकरी आहेत.

वसंतरावांचे आजोबा आत्माराम बाळाजी देसाई यांना रघुनाथ (बाबा), कृष्णाजी (दादा), शंकर (आबा) व विष्णू (अण्णा) असे चार सुपुत्र झाले. त्यापैकी कृष्णाजीचे वसंत हे शेंडेफळ. सन १९१२ मध्ये सोनावडयात वसंताचा जन्म झाला. आजोबांचे 'आत्माराम' नाव त्याला ठेवण्यात आले. त्यानंतर केव्हातरी कोणीतरी त्याला वसंत या नावाने हाकारले आणि त्या वसंत नावाच्या प्रभावाने यथाकाल त्याचे 'आत्माराम' नाम नामशेष झाले. रघुनाथबावांना घनःश्याम (नाना), श्रीधर (आबा), नरहरी (तात्या) व प्रभाकर (काका) असे चार मुलगे. बाबांचे घर म्हणजे घरंदाज देसायांचे घर. पै पाहुण्यांची वर्दळ फार. घरात मुलांचे गोकुळ. त्या गोकुळातच वसंत वाढू लागला. प्राथमिक शाळेत जाऊ लागला. शाळेतील हुषारी, चलाखी म्हणतात ती त्याजपाशी नव्हती. आपल्यापाशी जे नाही त्याची त्याने कधी फारशी खंतही केली नाही. पण जे त्याजपाशी होते ते मात्र त्याने जिवापाड जतन केले आणि मराठी चार इयत्ताही पूर्ण केल्या.

रघुनाथ बाबांचे एक व दोन नंबरचे मुलगे नाना व आना. शिक्षण, नोकरी, धंदा वगैरेमुळे घराला फारसे लाभले नाहीत. तिसरे नरहरी (तात्या). त्यांनीही मुंबई, कोल्हापूर वगैरे ठिकाणी अनेक उद्योग केले. तथापी सोनावडयाचे घरही त्यांनी मोठ्या सरदारकीने सांभाळले. ठेंगणीशीच ठाशीव मूर्ती पण तात्यांची कीर्ती देसाई घराण्याला साजेशी आहे. तात्या बहुश्रुत आहेत. झालेच तर राजकारणीही आहेत. दबदबीतपणा, लपवाछपवी त्यांचेकडे चालत नाही. वाणीचे फटकळ, तेवढेच मनाचे हळवे आहेत. अनेक गुंते एकाच वेळी शांतपणे सोडविण्याची त्यांची हातोटी वाखाणण्यासारखी आहे. तात्या आज पंच्याहत्तरीच्या घरात आहेत. प्रकृती अस्वास्थ्य आहे. तरीही इतर अनेक व्यापांबरोबर सोनावडयाच्या मठाची व्यवस्थाही तेच पाहातात. परवा वसंताच्या अपघाती मरणाची वार्ता समजताच लटपटत्या पायांनी सोनावडयाहून मुंबईला धावत आले.

कुटुंबात जेवढ्यास तेवढे वागण्याची तात्यांची पद्धत होती. कोणाचे भलते लाड त्यांनी कधी केले नाहीत. का कोण जाणे, आपल्यापेक्षा दहा वर्षांनी लहान असणाऱ्या वसंतावर मात्र त्यांचा फार जीव होता. वसंताच्या गोड गळ्याचे व त्याच्या शरीरसौष्ठवाचे तात्यांना फार कौतुक वाटे. वसंतातील कलेचा साक्षात्कार त्यांना झाला होता. वसंत एक दिवस सोनावडेकर देसायांचे नाव काढणार असा विश्वास त्यांना वाटत होता. पण सोनावड्याच्या माळावर त्याच्या कलेचा विकास कसा होणार ? वसंताची स्वतःची आत्यंतिक धाव कुडाळपर्यंत. त्यातून जमेल तशी कला साधना तो करीत होता. तथापी त्यातून विकासाची वाट भेटत नव्हती. त्याच्या कलेची मुस्कटदाबी थांबत नव्हती. तात्यांना ती पाहावत नव्हती. वसंताच्या कलेचे चीज झालेच पाहिजे अशी त्यांना तळमळ लागली होती. पण नुसत्या तळमळीने काय होणार ? आणि अखेर तो दिवस उजाडला. तात्या वसंताला घेऊन कोल्हापूरास गेले आणि वसंताच्या भावी विकासाची मुहुर्तमेढ रोवली गेली.

तात्या आपल्या वडील बंधू-नानाबरोबर कोल्हापुरात व्यापार-उद्योग करीत. व्यवसायामुळे त्यांचा अनेक थोरा-मोठ्यांशी घनिष्ठ संबंध आला. तात्यांच्या लाघवी स्वभावामुळे त्यांच्या भोवती मित्र जमण्यास वेळ लागला नाही. सन १९२९ मध्ये कोल्हापूरात प्रभात सिनेमा कंपनी स्थापन झाली. त्या कंपनीचे अध्वर्यू व्ही. शांताराम तात्यांचे जानी दोस्त बनले. तात्यांनी वसंताला शांतारामबापूकडे कंपनीत नोकरीला ठेवले. एक शागीर्द हरकाम्या पोऱ्या असेच त्या नोकरीचे स्वरूप होते. तथापी ती नोकरी बजावीत असता शिकण्याची संधी लाभणार होती. ज्या संधीची वसंत आतुरतेने वाट पाहात होता ती संधी आता त्याला सामोरी झाली होती. कोल्हापुरात वसंत नाना-तात्यांच्या म्हणजे आपल्याच घरात राहात होता. कंपनीत नोकरी करीत होता. ती करीत असतानाच संगीताचे सखोल ज्ञान मिळावे म्हणून तात्यांनी त्याला आपले मित्र बाबा देवल यांच्या गायन क्लबात दाखल केले.

ज्ञान देणारा गुरु नसतानाही ज्ञान घेणाऱ्याच्या दृढ निश्चयाने ते घेतले जाते, ह्या एकलव्यी गोष्टीचा प्रत्यय कोल्हापुरातील वसंताच्या खडतर ज्ञान साधनेवरून यावा. वसंताला ज्ञान देण्यास फारसे कोणी उत्सुक नव्हते. एक

खेडवळ पोर, त्याला काय शिकवायचे ? मग अशी वृत्ती असल्यावर वसंताच्या गुणांना चालना देणारा गुरु त्याला कसा भेटावा ? वसंताने आपल्या इच्छा-शक्तिलाच गुरु केले आणि त्या गुरूच्या कृपेने सिनेमा उद्योगातील सर्व बारकावे त्याने आत्मसात केले. संगीताचे स्वर त्याच्यावर प्रसन्न झाले. कंपनीतील त्याचे सेवाव्रत चालूच होते. त्यात मानहानीचे, अप्रतिष्ठेचे प्रसंग वारंवार येत. प्रखर ध्येयनिष्ठेच्या बळाशिवाय खानदानी घराण्यात वाढलेल्या वसंताला ते प्रसंग कसे पचवता आले असते ? वसंताने लोखंडाचे चणे पचविले. म्हणूनच त्याच्या रूपाने एक प्रतिभाशाली, अष्टपैलू, हरहुन्नरी संगीत कलाकार जगाला लाभला. 'अयोध्येचा राजा' हा पहिला मराठी बोलपट काढण्याचा मान प्रभातचा. त्या बोलपटाच्या निमित्ताने प्रभातच्या संगीत विभागाचा जन्म झाला. संगीत विभाग सज-विण्यासाठी विविध कलाकार लागतात. बहुतेक सर्व कलाकार लहरी असतात. त्यांच्या लहरी सांभाळता, सांभाळता चालकांच्या नाकी नऊ येतात. पण वसंताने कुठेही उणे पडू दिले नाही. कुठल्याही कठीण समस्येला तो सर्वांगाने सामोरा गेला. तो 'प्रभात'चा कलिजा बनला होता. 'प्रभात' वसंतमय झाली होती. 'अयोध्येचा राजा' वसंताने बजावलेल्या कामगिरीची साक्ष देण्यास समर्थ आहे.

इ. स. १९३३ मध्ये प्रभात कंपनी पुण्यात आली. त्याबरोबरच पुण्यात वसंताचे आगमन झाले. राहावयाचे कुठे हा प्रश्न होता. पुण्यातील सुप्रसिद्ध टोपीवाले, नारायण गोविंद राजिवडेकर यांना तात्यांनी चिठ्ठी दिली आणि वसंताची सोय लागली. पुण्यातील प्रभातचा स्टुडिओ वसंताचे गुरुकुल झाले. शांतारामबापू गुणपारखी होते. वसंताच्या गुणाचा त्यांनी भरपूर उपयोग करून घेतला. त्यामुळे वसंताला सिनेमाच्या विविध क्षेत्रातील ज्ञान संपादण्यास वाव मिळाला. गोविंदराव टेंबे, केशवराव भोळे, मास्टर कृष्णराव अनुक्रमे प्रभातचे संगीत दिग्दर्शक होते. त्यांच्या हाताखाली वसंतराव अंग मोडून काम करीत. त्यांच्या परिश्रमाने प्रभातचे संगीत दर्जेदार होऊ लागले. प्रभातचे बोलपट विक्रमी ठरून गाजू लागले. तथापी या यशाचे प्रमुख प्रणेते वसंतराव कंपनीत एक मामुली नोकर होते. कुठल्याही शाखेचे प्रमुख म्हणून त्यांचे नाव पडद्यावर झळकत नव्हते. पडद्याआड राहूनच त्यांनी प्रभातचे

दर्जेदार संगीत दिग्दर्शन केले. वसंतरावांची ' प्रभात ' मधील बारा वर्षे ही एक प्रकारे अज्ञातवासाचीच म्हणावी लागतील. तथापी वसंतरावांनी ती सार्थकी लावली. त्यांच्यातील अमर कलाकाराची जडण घडण याच काल-खंडात झाली.

एका तपानंतर प्रभातमधील वसंतरावांची ' बहुरूपी ' भूमिका संपली. प्रभातमध्ये तावून सुलाखून विशेष तेजस्वी बनलेल्या वसंताचे इ. स. १९३९ मध्ये मुंबापुरीत आगमन झाले. शिवाजी पार्कवरील ' परिमल ' वास्तूत त्यांचा निवास सुरू झाला. त्या ' परिमल ' मधून त्यांचा कीर्तीपरिमल पसरण्यास सुरुवात झाली. वसंतराव आता कोणाचे शागीर्द नव्हते. अभिनव प्रज्ञेचे स्वतंत्र संगीतकार होते. ' परिमल ' मध्ये संगीताचा संसार थाटला गेला. हौशी, होतकरू कलावंतांची वर्दळ तेथे सुरू झाली. वसंतरावांकडे लहान मोठा हा भेदभाव नव्हता. कलेची भक्ती हीच एक कसोटी होती. त्या कसोटीला उतरलेल्या सर्वांना त्यांच्या संसारात मुक्तद्वार होते. शास्त्रीय संगीत, नाट्यगीत, राष्ट्रगीत, समरगीत, भावगीत, भक्तिगीत, बालगीत, अशा सर्व गीतांना त्यांनी अभिनव चाली लावल्या. त्या चाली त्यांना कुठल्या ग्रंथात सापडल्या नव्हत्या. त्यांना लाभलेल्या वरदानामुळे त्यांना त्या आपो-आप स्फुरत असत. गीतांच्या चालीतून भावरसोत्पत्ती व्हावी म्हणून त्यात वसंतराव जीव ओतीत असत. म्हणूनच वसंतरावांचा हात लागताच होनाजी बाळाची भूपाळी ' अमर भुपाळी ' ठरली. इ. स. १९६२ च्या भारतावरील चिनी संकटाचे वेळी ' जिंकू किंवा मरू... ' या माडगूळकरांच्या समरगीताने भारतीय जनता पेटून उठली ती त्या गीताला मिळालेल्या वसंतरावी स्वर संगीतामुळेच.

वसंतरावांच्या पाठोपाठ शांतारामबापूंनी प्रभातला रामराम ठोकला. मुंबईत त्यांनी स्वतंत्र सिनेमा उद्योग सुरू केला. त्यांच्या ' राजकमल पिक्चर्स ' च्या उभारणीला सुरुवात झाली. अर्थात बापू आणि वसंत ही जोडी पुन्हा जमली. बापूंची निर्मिती आणि वसंताचे संगीत मग काय विचारता ? इ.स. १९४३ मध्ये निघालेल्या ' शकुंतला ' या त्यांच्या पहिल्याच चित्राने सर्वांना कौतुकाचा धक्का दिला. संगीत दिग्दर्शक म्हणून वसंतरावांचे नाव प्रथमच रूपेरी पडद्यावर झळकले. एक दर्जेदार संगीतकार म्हणून चित्रपट सृष्टीत त्यांचे

नाव ज्याच्या त्याच्या तोंडी झाले. याच वेळेपासून वसंतरावांचे यश शुक्लेंदुवत् वाढत गेले. यथाकाल एक अष्टपैलू, प्रतिभाशाली संगीतकार म्हणून जगाला त्यांची ओळख झाली. सिनेमातील पार्श्वसंगीताचे ते आद्य उद्गाते होते. पार्श्वसंगीत परिणामकारक होण्यासाठी त्यांनी जीवापाड मेहनत घेतली होती. नवनवे प्रयोग केले होते. त्यांचे सहकारी त्यांना पार्श्वसंगीताचे बादशहा म्हणत. सिनेमातील उसन्या आवाजाची सुरुवातही वसंतरावांच्या आवाजानेच झाली. आपल्या कला साधनेत वसंतरावांनी अनेकांकडून अनेक गोष्टी शिकून घेऊन आत्मसात केल्या. पण त्यांनी कधी अंधानुकरण केले नाही. जेथे जेथे त्यांचा हात फिरला तेथे तेथे त्यांनी आपला खास वसंतरावी छाप ठामपणे ठेऊन दिलेला आहे.

वसंतरावांना फार मोठा लौकिकमान लाभला. 'झाशीची राणी' चित्रपटाच्या निमित्ताने ते इ. स. १९५३ मध्ये इंग्लंडला जाऊन आले. इ. स. १९६७ मध्ये त्यांना 'पद्मश्री' मिळाली. गौरव समारंभ झाले. मुलाखती प्रसिद्ध झाल्या. अध्यक्षस्थाने मिळाली. वसंतराव आयुष्यात कधी प्रसिद्धीच्या मागे लागले नव्हते. पण आज प्रसिद्धीने आपणहून त्यांना आलिंगन दिले. पण वसंतराव बावचळले नाहीत. त्यांचा समतोलपणा तसूभरही ढळला नाही आणि तो ढळावा तरी कसा ? वसंतरावांचा जीवनक्रम एखाद्या व्रतस्थ साधूसारखा होता. जीवन हे देहभोगासाठी नसून त्यागासाठी आहे अशी त्यांची धारणा होती. म्हणूनच देण्यासारख्या सर्व गोष्टी त्यांनी देऊन टाकल्या होत्या. त्यापासून मिळणारा आनंद मात्र त्यांनी लुटला होता. त्यांच्या त्यागवृत्तीमुळे रावापासून रंकापर्यंत सर्वांनाच ते हवे हवेसे वाटत. आपला कार्यभाग साधण्यासाठी वसंतरावांना विनामोबदला राबविण्यात थोरामोठ्यांनाही संकोच वाटत नसे.

आयुष्यात अमाप यशाचे धनी होऊनही वसंतरावांनी लग्न केले नाही. त्यांचे संगीत कलेशीच खऱ्या अर्थाने लग्न लागले होते. त्याचसाठी त्यांनी फार मोठा प्रपंच केला. आपल्या कुटुंबियांपासून ते अलिप्त राहात. पण त्यांच्या सुखदुःखात सहभागी होत असत. अडीअडचणीला धावून जात असत. आजन्म सिनेमाच्या मोहमयी दुनियेत ते वावरले, पण कधी मोहाला बळी पडले नाहीत. व्यसनी सहकाऱ्यांच्या घेराव्यात पडूनही निर्व्यसनी राहिले. कमळा-

प्रमाणे चिखलात राहूनही निर्मळ राहिले. आपल्या कलेचा उपयोग आपल्या देशाला, समाजाला, मुलांना व्हावा असे त्यांना मनापासून वाटे. प्रसंगी पदरमोड करूनही ते लोकोपयोगी कार्यक्रम बसवीत असत. आपल्या घरावर, गावावर, कोकणवर त्यांचे निरतिशय प्रेम होते. कुडाळच्या मारुती मंदिराचा जिर्णोद्धार करण्याचे त्यांनी ठरविले होते. इतरही अनेक लहान मोठी कामे त्यांना करावयाची होती. सुदैवाने वसंतरावांचे चहाते असंख्य आहेत. ते सर्व सज्जन त्यांच्या संकल्पित कार्याला हातभार लावून त्यांना साजेशी श्रद्धांजली वाहातील यात काय संशय ?

● ●

स्वरभूषण वसंत देसाई

•

— गुं. फ. आजगांवकर

पद्मश्री वसंतराव देसाई हे पार्श्व संगीताच्या क्षेत्रातील ध्रुवताराच होत ! एकलव्याप्रमाणे त्यांनी निष्ठेने विद्याभ्यास केला. श्रद्धेमुळे संगीताच्या क्षेत्रात ते स्वर–सम्राट ठरले. ते शिवभक्त होते. ते शिवलीलामृताचा एक अध्याय नियमाने वाचीत. ते मारुतीची भक्ती करीत. स्वरसाधनेबरोबरच बलसाधना नियमित करीत. त्यांच्या राहत्त्या ठिकाणी अष्टविनायकांना प्रमुख स्थान होते. येथे सिद्धटेकचा सिद्धी विनायक, रांजणगावचा गणपती, मोरगावचा मोरेश्वर, ओझरचा विघ्नेश्वर, पालीचा बल्लाळेश्वर, मठचा वरदविनायक, लेण्यांद्रीचा गिरिजात्मक आणि थेरुरचा चिंतामणी त्यांच्या 'परिमल' मध्ये राहिले आहेत. 'नमो आदिरूपा ॐकार स्वरूपा' अशी त्यांची भावना होती. भक्तिभावाने ते तीर्थयात्रा करीत. ॐकार स्वरूपी परब्रह्माचा ध्यास घेतलेले भक्तिमार्गावरचे ते तापसी होते. ते संगीताच्या साधनेतून परमेश्वर-प्राप्तीचा मार्ग शोधीत होते. नादब्रह्मात मग्न झालेले ते सूरसृष्टीचे ईश्वर होते. आपल्या शिष्यांवर आईच्या ममतेने प्रेम करणे हा त्यांचा स्वभाव होता. उदयोन्मुखांना... कलावंतांना...प्रोत्साहन देणारे ते आधार होते; आणि लोकांचाही त्यांच्यावर अपार लोभ होता.

तो सोमवारचा दिवस होता. २२ डिसेंबर १९७५. वसंतराव सबंध दिवस आपली कामे पूर्ण करीत चालले होते. ते अत्यंत आनंदात होते. इतक्यात त्यांना स्वर्गातून बोलावणे आले. सूर्यास्ताची वेळ होती. त्यांनी लिफ्टमध्ये पाऊल ठेवले. तेच त्यांचे मृत्यु लोकातील शेवटचे पाऊल ठरले. ते क्षणात निघून गेले. कोणाच्या ध्यानीमनी नव्हते ते घडले आणि मुंबापुरी शोक-सागरात बुडून गेली. महाराष्ट्रातील त्यांचे लक्षावधी चहाते शोकमग्न झाले आघात मोठा होता. दुःख अपार होते. दुःखाच्या लाटा एकामागून एक

हेलावत होत्या. अश्रू...केवळ अश्रू...आणि निःशब्द शांतता. स्वर्गीय सूर गाणारा, माणुसकीने वागणारा, जनसागराला स्फूर्ती देणारा, मुलाफुलांमध्ये रमणारा कोमल अंतःकरणाचा देवदूत देवलोकी गेला हे एक सत्य होते.

कुलवृत्तांत

वसंतरावांचा जन्म ९ जून १९१२ मध्ये कोकणातील कुडाळ तालुक्यातील सोनवडे ह्या गावी कुडाळदेशकर आद्य गौड ब्राह्मण ज्ञातीत झाला. त्यांचे गोत्र धनंजय ! कुलदैवत आदिनारायण. ' जान्हवीतीर संभूतो, वेदवेदांग पारगः। श्रुताध्ययनसंपन्न सत्यवाणी जितेंद्रियः ' असा ह्या सामंत कुलाचा उल्लेख नागदेवाच्या ताम्रपटात आहे. कोकणातील ह्या सामंत राजवंशाचा इतिहास कै. रावबहादूर वासुदेवराव बांबर्डेकर यांनी 'मठगावचा शीलालेख ह्या नावाने लिहून प्रसिद्ध केला आहे. त्यात त्यांनी नागसामंत आणि देमसामंत यांनी दिलेल्या ताम्रपटांचे ठसे देऊन सप्रमाण इतिहास मांडला आहे.

' वसंतराव देसाई हे परुळे गावचे सामंत, देसाई होत. सामंत म्हणजे मांडलिक राजे. ही सामंत घराणी देशकाचे हक्क प्राप्त झाल्यावर देसाई म्हणवून घेऊ लागले. सोनवडे येथे स्थायिक झाल्यावर त्यांना सोनवडेकर देसाई म्हणून ओळखण्यात येऊ लागले. क्षात्रवृत्ती, धार्मिक आचरण, वेदाध्ययन आणि अध्यात्म क्षेत्रातील स्थान ह्या बाबतीत ह्या कुलाची प्रसिद्धी आहे. गेल्या युद्धात अनेक सामंत महावीरचक्र, वीरचक्र वायुसेनापदक यांचे मानकरी ठरले. ह्या गौडब्राह्मण ज्ञातीचे आद्य धर्मपीठ सोनवडे येथेच आहे व त्याची व्यवस्था पुन्हा वसंतरावांच्या घराण्याकडे आलेली आहे.

राष्ट्रभक्ती आणि समाजसेवा, श्रीमंती आणि दातृत्व, सत्यनिष्ठा आणि धार्मिकता यात ही ज्ञाती प्रसिद्ध आहे. सकाळकार ना. भि. परुळेकर, दानशूर अनंत शिवाजी देसाई, ' महात्मा गांधी ' ह्या इंग्रजी चरित्राचे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे लेखक डॉ. डी. जी. तेंडोलकर, संतचरित्रकार महाराष्ट्र भाषाभूषण ज. र. आजगावकर, भिषग्वर्य डॉ. वामन गणेश देसाई, कोकणचे कर्वे म्हणून प्रसिद्ध असलेले कृष्णराव देसाई. नामदार पाटील यांसारखी नररत्ने या कुळात जन्मली. संत चिदानंद, संत गोपाळ बोध सामंत, बाडमठाचे संस्थापक पद्मनाथ तीर्थस्वामी, निवतीचे श्रीमद्दत्तगिरी महाराज आणि विद्यमान सद्गुरु भालचंद्र महाराज यांच्यासारखे विदेही व थोर आध्यात्मिक

वारसा असलेले सत्पुरुष याच कुलात जन्मले.

वसंतरावांना आपल्या पित्याकडून जसा सांस्कृतिक वारसा लाभला तसाच आईकडूनही आनुवंशिक वारसा लाभला. त्यांच्या आईचे नाव मुक्ता. मालवणचे आबा भास्कर परुळेकर यांची मुक्ता ही एकुलती कन्या. आबा भास्कर यांना वंशपरंपरा मालवणच्या सिंधुदुर्ग किल्ल्यावर कीर्तन करण्याची छत्रपतींची सनद होती. या घराण्यापैकी एक पुरुष अर्नाळा किल्ल्यावर किल्लेदार होता. त्याच्या नावावरून वसईच्या एका भागाला भास्कर आळी हे नाव देण्यात आले. भास्कर आळीत परुळेकरांचा जुना वाडा आजही दृष्टीस पडतो.

आबा भास्कर यांच्या घराण्यातील कीर्तनपरंपरेचे उच्च संस्कार मुक्ताबाईच्या मनावर झालेले होते. त्यांच्या ठिकाणी ईश्वरविषयक दृढ श्रद्धा होती. मुक्ताबाईला भक्तिगीते, स्तोत्रे व अभंग म्हणण्याचा छंद होता. मातेच्या अंगचे सर्व सद्‌गुण वसंतरावांच्या ठिकाणी मूलतःच होते. त्यांनी आपल्या परिश्रमाने, अभ्यासाने, ह्या गुणांचा पूर्व विकास केला.

वसंतरावांचे शिक्षण सोनवडे, कुडाळ आणि सावंतवाडी या ठिकाणी झाले. इंग्रजी तीन इयत्ता पूर्ण करून त्यांनी आपले हे लौकिक शिक्षण पूर्ण केले. त्यांचे खरे शिक्षण झाले ते निसर्गाच्या सान्निध्यात. सूर्योदयाच्या वेळी मारुतीच्या देवळातील काकड आरतीचा घंटानाद, कोंबडयाचे पहाटेचे आरवणे, गुरांच्या गळयातील घुंघुरांचा किणकीण आवाज, वाऱ्याची शीतल सळसळ इत्यादी नादध्वनीमुळे त्यांचे मन संगीताकडे आकर्षित झाले.

गावच्या भजनी फडातून ते अभंग गाऊ लागले. दशावतारी जत्रा पाहाण्यासाठी आजूबाजूच्या गावातून ते जाऊ लागले. दशावतारी संगीतात आणि अभिनयात ते अल्पावकाशातच रस घेऊ लागले. बाजाच्या पेटीची सुरावट त्यांच्या बोटांवर नाचू लागली. महारवाडयातील सनईचे सूर त्यांना बेभान करू लागले. स्वरांच्या मागाहून वसंतराव चालू लागले. त्यांच्या पूर्वजांनी कधी न अनुसरलेल्या मार्गाने वसंतरावांचा प्रवास सुरू झाला. ते कोल्हापुरास प्रभात फिल्म कंपनीत हरकामे म्हणून राहिले. राम्या शागीर्दाचा रामशास्त्री प्रभुणे इतिहासात अमर झाला. वसंतरावांनी प्रभातमध्ये शागिर्दी केली. दुःखाचे, मानहानीचे सारे प्रसंग सहनशीलतेने सोसून आपला निश्चय तडीस नेला. ते स्वरसम्राट झाले. पद्मश्री झाले. महाराष्ट्र राज्याचे संगीत

सल्लागार झाले. विधानसभेचे सदस्य झाले. त्यांनी पार्श्वसंगीत दिलेल्या बोलपटांनी लोकप्रियतेचे उच्चांक गाठले.आचार्य अत्र्यांनी ' श्यामची आई ' ह्या चित्रपटाच्या यशाचे श्रेय ह्या थोर संगीत कलाकाराला दिले. आचार्यांनी आपल्या विस्तृत आत्मचरित्रात वसंतरावांचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. आचार्य अत्रे आपल्या ' कऱ्हेचे पाणी ' या आत्मवृतांतात वसंतरावांबद्दल काय म्हणतात ते वाचण्यासारखे आहे. मराठी भाषेतील ह्या निर्भीड साहित्य सम्राटाने वसंतरावांच्या अमर यशाचे यशोगान मुक्तकंठाने केले आहे. वसंतरावांच्या स्वर्गीय संगीतामुळेच सानेगुरुजींची ' श्यामची आई ' हा बोलपट राष्ट्रपती सुवर्ण पारितोषकाचा अखिल भारतात एकमेव मानकरी ठरला. वसंतराव ' श्यामची आई ' मध्ये समरस झाले होते. ते जणू स्वतःच्या आईचेच चित्र अमर करीत होते. म्हणूनच मातेचे हे महन् मंगल स्तोत्र अमर ठरले.

●●

वसंतरावांविषयी आचार्य अत्रे म्हणतात-

'**उजाडता,** उजाडता लाडघरच्या रस्त्यावर चित्रणाच्या कामाला सुरुवात झाली. शामची आई (वनमाला) ही लाडघरच्या तामस तीर्थात स्नान करण्यासाठी बैलगाडीतून निघालेली असते. तिच्या मांडीवर डोके ठेवून श्याम पहुडलेला असतो. दिशा फडफडू लागल्या आहेत. पूर्वेची कड किंचित आरक्त झालेली आहे. कोंबड्याच्या आरव कोठल्या तरी शेतकऱ्याच्या झोपडीतून उठतो आहे. अशा वेळी 'घनदाट रानी वाहे झुळूझुळू पाणी। पाखरे ही गोड गाती देवाजीची गाणी' हे गाणे श्यामला उद्देशून त्याची आई आपल्या मधुर स्वरात गात आहे. ते मंजुळ स्वर साऱ्या आसमंतात निनादून राहिलेले आहेत. हे गाणे प्रा. वसंत बापट यांनी रचलेले होते. त्या गाण्याचे स्वर सौ. आशा भोसले ह्यांच्या मधुर कंठांतून उमटलेले होते. ह्या गाण्याला (आता 'पद्मश्री') वसंत देसाई ह्यांनी इतकी आकर्षक चाल लावलेली आहे की, ते ऐकताना श्रोत्यांच्या चित्तवृत्ती एकदम तल्लीन होतात. भावनेचा आणि माधुर्याचा परमोत्कर्ष साधण्याचा पराकाष्ठेचा यशस्वी प्रयत्न वसंतराव देसाई ह्यांनी ह्या गाण्यात केलेला आहे.

ह्या चित्रपटाच्या यशाचा वाटा जसा साने गुरुजींच्या अमर कथेत आहे तसाच तो वसंत देसाई ह्यांच्या अमर संगीत दिग्दर्शनामध्येही आहे. 'श्यामची आई' ही मूळ गोष्ट अतिशय भावनाप्रधान असल्याने ती परिणामकारक होण्यास तिला अनुकूल आणि प्रभावी संगीताची जोड हवी होती आणि हे संगीत भारतीय संस्कृतीचा आणि महाराष्ट्रीय जीवनाचा परिपोष करणारे असे असावयास पाहिजे होते. असे संगीत देण्याचे पावित्र्य नि सामर्थ्य ज्यांच्या अंगी आहे, असा एकच संगीत दिग्दर्शक ह्या भारतात आहे आणि तो म्हणजे वसंतराव देसाई. म्हणून मी पहिल्यापासून वसंतराव देसाई ह्यांचे नाव माझ्या मनाशी योजून ठेवले होते. पण त्यांच्या पात्रते-इतका पैसा त्यांना द्यावयाला माझ्याजवळ कुठे होता ? दोन हस्तक आणि तिसरे मस्तक एवढेच माझ्याजवळ भांडवल.

वसंतरावांचे दुसरे वैशिष्टच हे की, ते माझ्याएवढेच गुरुजींचे प्रेमी होते. त्यामुळे गुरुजींच्या त्या प्रेमाने त्यांनी ह्या कामाला आत्मियतेने वाहून घेतले अन् आपले सर्वस्व ह्या चित्रपटात ओतले. त्यांच्या गुणाचे काय वर्णन करावे ? 'श्यामची आई' त अवघी सहाच गाणी आहेत. पण प्रत्येक गाण्याला त्यांनी लावलेली चाल आणि तिची केलेली स्वर-रचना अविस्मरणीय आहे.

'श्यामच्या आई'तले सर्वात महत्त्वाचे गाणे म्हणजे 'चिंधी'चे गाणे. त्या गाण्याच्या पहिल्या दोन ओळी गुरुजींच्या आहेत. बाकीचे सर्व गाणे माझे आहे. ह्या गाण्याला वसंतरावांनी जी चाल लावलेली आहे, तिने महाराष्ट्रीय स्त्री–गीतांची परंपरा इतकी उज्ज्वल केलेली आहे की, त्या गाण्यातल्या काव्याच्या पोटात संगीत लुप्त होते, हाच संगीत दिग्दर्शकाचा खरा विजय आहे.

'श्यामच्या आई'मध्ये मी राजकवी यशवंतांच्या 'आई' या महान काव्याचा उपयोग केला आहे. त्या काव्याला विलक्षण भावनाविव्हल चाल लावून होनाजी बाळाच्या 'अमर भूपाळी' प्रमाणे वसंतरावांनी तिला अमर करून टाकली आहे. त्यामुळे ते गाणे म्हणजे त्या चित्रपटातल्या करुण रसाचा परमोच्च बिंदू ठरतो तो केवळ वसंतराव संगीत दिग्दर्शक होते म्हणूनच साधला गेला. ह्या चित्रपटातले पार्श्वसंगीत हा तर वसंतरावांच्या प्रतिभेचा दुसरा चमत्कार होय. आपल्या स्वरांच्या जादूने न बोलका भाग बोलावयास लावला आणि शब्दा शब्दांतून रसाचे फवारे उचंबळावयाला लावले. चित्रपटाच्या शीर्षकात (Titles) जेव्हा सानेगुरुजींची मूर्ती रजतपटावर येते तेथे गाईच्या हंबरण्याचे पार्श्वसंगीत टाकून तर वसंतरावांनी सानेगुरुजींच्या महन्मंगल जीवनाचा सारांशच स्वररुपाने प्रेक्षकांना ऐकवलेला आहे. म्हणूनच मी म्हणतो की, या चित्रपटाच्या यशाचे अर्धे भागीदार वसंतराव देसाई हेच होत.'

('कऱ्हेचे पाणी' पृष्ठ ४९८–९९)
खंड ४ था

वसंतरावांची तपःश्चर्या

वसंतराव कोल्हापूर येथे येऊन हरकामे म्हणून प्रभात फिल्म कंपनीत राहिले. त्या वेळी सिनेमात वा नाटकात राहून काम करणे हे कुडाळदेशकर गौड समाजात अप्रतिष्ठेचे समजण्यात येई. त्यामुळे ह्या क्षेत्रात राहूनही त्यांना त्यापासून अलिप्तपणे राहाण्याचे एक व्रत प्रथमपासून घ्यावे लागले. ते निश्चयी होते. सिनेमाच्या सर्व प्रकारच्या मोहजालातून आपणाला अलिप्त ठेवून ह्या क्षेत्राच्या उत्कर्षाला हातभार लावण्यासाठी त्यांनी खऱ्याखुऱ्या संगीताच्या अभ्यासाकडे बाकीचा सर्व वेळ ते खर्च करू लागले.

कोल्हापूरचे प्रसिद्ध अल्लादिया खां यांचेकडे त्यांनी प्रारंभीचे शिक्षण घेतले. (कै. गोविंदराव टेंबे हेही अल्लादिया खांचे शिष्य) अल्लादिया खां यांच्या मृत्यूनंतर त्यांनी इनायत खां यांचेकडे पुढील अभ्यास केला. इनायत खांचे पुत्र मंजी खां हेही उच्च दर्जाचे गायक होते. भावगीत गायनाचा प्रकार महाराष्ट्रात सुरू करण्याचा पहिला मान या मंजीखांनाच द्यावा लागेल. वसंतरावांनी मंजी खांच्या प्रत्येक कार्यक्रमास हजर राहून आधुनिक पद्धतीच्या गीतांना शास्त्रीय बैठक दिली नि ती कशी गावी याचा बारकाव्याने अभ्यास केला. त्यांच्या ह्या तपःश्चर्येमुळेच त्यांना संगीताचा आत्मा समजू शकला. शब्दांना अर्थ प्राप्त करून देण्याचे सूरांचे सामर्थ्य काय हे वसंतरावांच्या गीतांचा अभ्यास करणारांना समजून येईल. उत्तर भारतातून आलेल्या डागर बंधूकडून त्यांनी त्यांची गायकी शिकून घेतली. अभंग कसे गावेत हे ते मास्टर कृष्णराव यांच्याकडून शिकले.

गुणगौरव

१९६७ मध्ये त्यांना राष्ट्रपती राधाकृष्णन् यांचेकडून पद्मश्री हा बहुमान मिळाला. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य–पुरस्कार देऊन महाराष्ट्र सरकारने त्यांचा १९६७ मध्ये गौरव केला. महाराष्ट्रातील शालेय शिक्षणातील संगीत-विषयक जबाबदारी त्यांचेवर सोपविली. मोबदल्याची अपेक्षा न धरता गेली पाच वर्षे त्यांनी महाराष्ट्रभर प्रचारकार्याचे दौरे काढले. बालभारतीतील गीतांना सुंदर चाली लावून त्यांच्या रेकॉर्डस् प्रसिद्ध केल्या. भारत-चीन युद्धाच्यावेळी 'जिंकू किंवा मरू' हे समरगीत शिवाजीपार्कच्या मैदानात एक लाख मुलांकडून म्हणवून घेतले. १९६९ साली महात्मा गांधी जन्मशताब्दी सोहळ्याचे वेळी अनेक गीते गाऊन त्यांनी लोकांना गांधीदर्शन घडविले. 'एक ताल एक सूर' या कल्पनेचे ते प्रवर्तक झाले. पुढील काळात त्यांनी अनेक समरगीतांना चाली दिल्या आणि ती गीते अमर केली. १९७४ मध्ये शिवराज्याभिषेकाची गीते त्यांनीच लोकप्रिय केली.

बालपणी वसंतरावांना कोकणातील दशावतारी जत्रा पाहाण्याचा नाद होता. त्यातून त्यांनी भूमिकाही केल्या होत्या. कोकणच्या दशावतारी लोक-नाट्याची परंपरा कित्येक शतकांची आहे. सामान्य जनतेला सुसंस्कृत करण्याचे कार्य ह्या संस्था करतात. मनोरंजनाच्या द्वारे भारतीय संस्कृतीचा प्रसार करण्याचे कार्य त्यांच्याकडून होते. मृत्यूपूर्वी ह्या दशावतारी संस्थांच्या दु:स्थितीकडे वसंतरावांचे लक्ष वेधले होते. ते असते तर ह्या संस्थांच्या पुनर्जीवनासाठी त्यांनी काही केले असते !

काही बोलपट व गीते

गेली चाळीस वर्षे आपल्या स्वर्गीय संगीताने त्यांनी भारताला रिझविले. अनेक चित्रपटांचे संगीत दिग्दर्शन करून ते लोकप्रिय केले. 'शकुंतला' 'परबतपे अपना डेरा' 'डॉ. कोटनीस की अमर कहानी' 'दहेज' 'शीशमहल' 'अमर भुपाळी' 'दो आँखे बारह हाथ' 'तुफान और दिया' 'श्यामची आई' 'गुंज उठी शहनाई' 'गुड्डी' 'प्यारकी प्यास' इत्यादी बोलपट त्यांच्या संगीताने नटलेले व गाजलेले होते व पंडितराज जगन्नाथ (नाटक).

काही प्रसिद्ध गीते

घनःश्याम सुंदरा श्रीधरा, अरुणोदय झाला...
नयनसे नयन नाही मिलाओ...
झनक झनक पायल बाजे...
तेरे सूर और मेरे गीत...
बोल रे पपीहा...
टीम् टीम् टीम्, तारोंके दीप जले...
जिंकू किंवा मरू...
जय गंगे भागीरथी...
नारायणा, रमारमणा...
काय मौजेचा साईनाथ...
एक किरण मज देई...

(**साने गुरुजी** 'पत्री' संग्रह शेवटचे गाणे)

ए कहानी है दियेकी और तुफानकी ..
मंगल देशा, पवित्र देशा, महाराष्ट्र देशा...
बलसागर भारत होवो, विश्वात शोभुनी राहो !
जय जय शिवराया...
ये स्वराज्य सिंहासनी...

असे बोलत वसंत देसाई !

अत्रे यांच्या सत्कार प्रसंगी वसंत देसाई म्हणाले, 'संगीताच्या भाषेत बोलायचे झाल्यास आजची मैफल मस्त आहे. सामवेद गाणाऱ्यापासून तो भावगीत गाणाऱ्यापर्यंत सर्वांचा आजच्या मैफलीत समावेश झालेला आहे. माझी या ठिकाणी भूमिका 'भावगीत' गायकाची आहे, तेव्हा मोठ्या रागदारीची आपण माझ्याकडून अपेक्षा करू नका. अत्रे यांना मी वीस वर्षांपूर्वी पाहिले. कसे म्हणाल तर कॅमेऱ्याच्या 'लेन्स' मधून ! एकतीस साली कोल्हापूर येथे 'प्रभात' कपनीने 'काव्यगायना' चा एक छोटासा चित्रपट घेतला. त्यात अत्रे हेही एक गायक कवी होते. तेव्हापासून मी त्यांच्या व्यक्तिमत्वाकडे आणि वाङ्मयाकडे आकर्षित झालो. त्यांचे जीवन म्हणजे एक प्रचंड प्रवाह आहे. ह्या प्रवाहातून निरनिराळे कालवे निघालेले आहेत. पुष्कळांना अत्रे हे केवळ विनोदी आहेत असे वाटते. त्यांच्या विनोदाच्या अनेक 'दंतकथा' प्रसृत झालेल्या आहेत. माझीही तशीच समजूत होती. पण मी त्यांना जेव्हा हृदयाच्या नेत्रामधून पाहिले, तेव्हा अत्रे ही सुखदुःखाच्या अनुभवाचे सूर काढणारी एक कोमल पण कणखर 'वीणा' आहे. अशी माझी खात्री झाली. (टाळ्या)

ह्या वीणेवर ते ध्रुपद धमारापासून तो लावणीपर्यंत निरनिराळ्या राग रागिण्या काढतात. ते एक अष्टपैलू वादक आहेत. पण त्यांचे हृदय कारुण्याने ओथंबलेले आहे. 'श्यामची आई' संपल्यानंतर ते मला म्हणाले, 'वसंतराव, ह्या वेळी देहू अन् आळंदीला जाऊन ज्ञानोबांच्या आणि तुकोबांच्या पावलावर डोके ठेवावेसे वाटते. चित्रपटाच्या धंद्यात अत्रे ह्यांना यश मिळालेले नाही; त्याचे कारण त्यांचा व्यवहाराचा ढिलेपणा, दुसरे काही नाही.

('कऱ्हेचे पाणी' पान ५५१)
खंड ४ था

महान आनंदयात्री

वसंतराव देसाई यांच्या निधनाने संगीत क्षेत्रातील एक अत्यंत संपन्न जीवनाचा दुःखद परिस्थितीत शेवट झाला.

त्यांनी मराठी रंगभूमीला चढविलेला स्वर-साज ही त्यांची महत्त्वाची कामगिरी होय. चित्रपटातील भरदार गाण्याबरोबरच प्रसंगाला अनुरूप असे पार्श्वसंगीत देण्याचे त्यांचे कौशल्य विशेष होते. त्यांनी भारतीय वाद्यांचाच उपयोग केला आहे. त्यांनी पार्श्वसंगीताच्या मदतीने समरगीतांना समूह-गीतांचा साज चढविला. संगीत क्षेत्रातील ते एक जादूगार होते. शब्दांना अर्थ प्राप्त करून देणारे ते प्रतिज्ञानेश्वर होते. म्हणूनच स्वरांचा किमयागार हरपला अशा शब्दांत त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. भरभक्कम शरीराचा हा सदा आनंदी व हसतमुख असणारा कलाकार–महान आनंद यात्री– अज्ञाताच्या प्रवासाला निघाला आहे.

—**मधुकरराव चौधरी** (अर्थमंत्री)

संगीताचा हा महान सम्राट वृत्तीने संत होता. संतासारखे जीवन जगून त्याने एखाद्या नटश्रेष्ठासारखा मृत्यू स्वीकारला. त्यांचे जीवन व मृत्यू दोन्ही चटका लावणारे, अशा शब्दात राज्यमंत्री **प्रभाकर कुंटे** यांनी श्रद्धांजली वाहिली.

राष्ट्रप्रेम शिकविणारा महापुरुष, एक सहृदय व विनयशील वृत्तीचा राष्ट्रभक्त अशी अनेकांनी श्रद्धांजली वाहिली.

वसंत–स्वर प्रतिष्ठान

सुरांचे बादशाह वसंतराव देसाई यांचे स्मारक म्हणून वसंतसूर प्रतिष्ठान निर्माण करण्याचा निर्णय अर्थमंत्री मधुकराव चौधरी यांनी जाहीर केला. या प्रतिष्ठानाच्या द्वारे एकताल एकसूर हा कार्यक्रम महाराष्ट्रात सर्वत्र करण्यात येईल व प्रत्येक २६ जानेवारीस महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी बालकांचा सांघिक कार्यक्रम आयोजित करण्यात येईल. वसंतरावांचे अपुरे कार्य पुढे चालविण्यात येईल. वसंत देसाई यांच्या जीवनावर चित्रपट काढणे, चरित्र व आठवणी प्रसिद्ध करणे, त्यांची गाणी नोटेशनसह प्रसिद्ध करणे यासाठी समित्या नेमल्या आहेत.

आठवणी

श्रीमंत मोतीरामशेट देसाई टोपीवाले यांच्या 'आशा' बंगल्यावर माझा गीतरामायणाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. वसंतराव टोपीवाल्यांच्याच बंगल्यावर राहायला असल्यामुळे ते कार्यक्रमाला उपस्थित असण्याची शक्यता होती. आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या ह्या थोर कलाकाराच्या पुढ्यात माझ्या-सारख्या अप्रसिद्ध आणि पोरसवदा गायकाने गावयाचे म्हणजे मोठाच प्रसंग होता. गाणे सुरू होण्याअगोदरच वसंतराव समोर बसले होते. माझ्यासाठी गादीची प्रशस्त बैठक घातलेली होती. वसंतरावांसारख्या अद्वितीय कला-कारासमोर गादीवर बसणे माझ्या मनाला पटेना. मी ती गादी काढून साधी बैठक घालण्याचा आग्रह धरला. त्यावर वसंतराव म्हणाले, 'अहो सामंत, हा गायकाचा मानमरातब आहे. तुम्ही बसा त्या गादीवर!' शेवटी मी नम्रभावाने साध्या बैठकीवरच कार्यक्रम सुरू केला.

वसंतरावांसाठी मी मुद्दाम जुईचा गजरा नेला होता. तो त्यांच्या हातात बांधून त्यांना नमस्कार करून मी गाण्यास बसलो. माझे दत्तस्तवन सुरू झाल्यावर वसंतरावांनी वर नजर करून दत्ताला अभिवादन केले व दाद देण्याच्या प्रत्येक ठिकाणी मानेने व नजरेने मला प्रोत्साहन देऊन संबंध तीन तास त्यांनी रामचरित्र ऐकून घेतले. कार्यक्रम संपल्यावर माझ्या पाठीवर शाबासकीची थाप देऊन माझे कौतुक केले. मला म्हणाले—सामंत, तुम्ही माझ्याकडे या! मला तुमच्या आवाजाचा उपयोग करून घ्यावयाचा आहे. त्यांनी दिलेला त्यांचा फोन नंबर माझ्याकडे तसाच राहिला. असा थोर मनाचा कलाकार माणुसकीने वागणारा स्वरसम्राट एखाद्याला भाग्यानेच भेटतो.

—**बी. जी. सामंत** (बोरिवली)

कै. वसंतराव देसाई ही एक अत्यंत सहृदय, निगर्वी अंतःकरणाची थोर व्यक्ती होती. ही २८–२९ वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. कोल्हापूर येथे कै. मास्टर

विनायकाचे 'सुभद्रा' या हिंदी चित्रपटाचे संगीत दिग्दर्शन त्यांचेकडे होते व हंस पिक्चर्समध्ये मी कॅशियर अकौंटंट होतो. मला साहित्याची आवड असल्यामुळे मी वसंतरावांच्या संगीताकडे साहजिकच आकर्षित झालो. तत्पूर्वी त्यांची माझी प्रत्यक्ष ओळख नव्हती. कै. बाबा वर्दम नेपथ्य विशारद राजकलामंदिरमध्ये नोकरी मिळावी म्हणून माझ्याकडे कोल्हापुरास आले होते. मी त्यांना पत्र देऊन कै. वसंतरावाकडे पाठविले व त्यांनी त्यांच्या अंगचे गुण ओळखून त्यांना नोकरी मिळवून दिली. कै. राजा ठाकूर हे एक उत्तम दिग्दर्शक होऊ शकतील असे वसंतरावांनी भाकीत केले होते. वसंतरावावर कै. मास्टर विनायकांचे बंधुवत प्रेम होते. ते संगीतमय जीवन जगले. त्यांचे आदर्श जीवन अनेक पिढ्यांस मार्गदर्शक ठरेल.

—दाजी गव्हाणकर (अंधेरी)

एक सूर एक ताल

पद्मश्री वसंत देसाई यांना पं. नेहरू एकदा म्हणाले होते की, ‘तुम्ही येवढे मोठे संगीत दिग्दर्शक आहात तर सर्वांना एक सुरांत राष्ट्रगीत व इतर देशभक्तीपर गीते म्हणावयास शिकविले पाहिजे.’ पं. नेहरू यांच्या सांगण्याप्रमाणे पुढे शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी व वसंत देसाई यांनी महाराष्ट्रात एक मोठा प्रयोग करण्याचे ठरविले. महाराष्ट्र राज्याचे डायरेक्टर ऑफ म्युझिक म्हणून त्यांची नेमणूक झाली. ‘एक सूर एक ताल’ ह्या योजनेच्या यशासाठी वसंतराव महाराष्ट्राचे अनेक जिल्हे फिरले. संगीत क्षेत्रातील शिक्षकांसाठी व मुलांसाठी जिल्हावार शिबिरे घेऊन त्यांनी ही योजना यशस्वी केली. प्राथमिक शाळांतील मुलांसाठी ध्वनिमुद्रिका काढल्या. समरगीते, राष्ट्रगीते यांची नोटेशन्स् तयार केली. शाळा शाळांतून मोठमोठे कार्यक्रम आयोजून मुलांना उच्च दर्जाचे संगीत म्हणजे काय हे शिकविले.

ह्या उपक्रमामुळे लहान मुलांच्या मनावर एकराष्ट्रीयत्वाची भावना प्रतिबिंबित होते. एकीने वागण्याची सवय लागते. त्यांच्यात समता निर्माण होते.

काही ठराविक गाणी एक सूर व एक ताल यात मोठी माणसे व लहान मुले यापुढे गात असलेली महाराष्ट्रात दिसतील. यामुळे महाराष्ट्रात एकत्वाची भावना दृढमूल होण्यास मदत होईल.

महाराष्ट्र शासनाने त्यांना जे मानधन देऊ केले होते ते त्यांनी स्वीकारले नाही. इतकेच नव्हे तर प्रवासभत्त्यासाठी मंजूर केलेल्या रकमेचा काटकसरीने वापर करून बाकी पैसा परत केला.

वसंत देसाई यांची महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य म्हणून जेव्हा नेमणूक झाली तेव्हा नियमाप्रमाणे दोन जागांवर त्यांना राहाता येत नाही म्हणून संगीत संचालकत्वाचा राजीनामा देता किंवा कसे असे त्यांना मुख्यमंत्र्यांनी विचारले. तेव्हा ते म्हणाले की, मला एम. एल. सी. पदाचा लोभ नाही. पुढे पर्याय म्हणून एकसूर एकताल ही समिती निर्माण करून त्याचे अध्यक्षपद वसंतरावांना देण्यात आले व ते एम. एल्. सी. राहिले.

महाराष्ट्रातील हजारो संगीत शिक्षकांनी वसंतरावांचे स्वप्न साकार करण्याची प्रतिज्ञा केलेली असून महाराष्ट्रातील भावी पिढी एकसूर एकताल ही योजना यशस्वी करील असा विश्वास वाटतो.

मुख्यमंत्र्यांचा संदेश

पंतप्रधानांनी देशाला दिलेला वीस कलमी कार्यक्रम म्हणजे आधुनिक गीता आहे. त्या गीतेला सुरेल स्वर श्री. देसाई यांनी दिले आहेत. जनतेच्या जीवनातील निगडीत अशा ह्या कार्यक्रमासाठी कलेचे माध्यम वापरण्या इतका दुसरा चांगला उपयोग होऊ शकणार नाही. संगीत हे आपल्या संस्कृतीचे महत्त्वाचे अंग आहे. भारतीय संगीताची परंपरा थोर आहे. अनेक प्रकारच्या राष्ट्रीय कार्यासाठी भारतीय संगीताने भारतीय मनात चैतन्य निर्माण केले आहे, त्यास कार्यप्रवण केले आहे. त्या संगीताच्या माध्यमातूनच एका महत्त्वाच्या राष्ट्रीय कार्यक्रमाला चालना व गती देण्याचे काम श्री. वसंतराव देसाई यांनी अंगीकारलेले आहे. वीस कलमी कार्यक्रम हा आमजनतेच्या फायद्यासाठी आहे. त्यामुळे ही जनता व त्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करणारा वर्ग ह्या दोघांनाही ह्या संगीतमय उपक्रमातून नवीन प्रेरणा व उत्साह मिळेल अशी मला खात्री आहे.

शंकरराव चव्हाण
महाराष्ट्राचे मुख्यमंत्री

वसंत देसाई यांनी संगीत दिलेले चित्रपट

मराठी चित्रपट : अमरभूपाळी, रामजोशी, साखरपुडा, शामची आई, मोलकरीण, छोटा जवान, स्वयंवर झाले सीतेचे, इये मराठीचिये नगरी, धन्य ते संताजी धनाजी, वासुदेव बळवंत, ही माझी लक्ष्मी, माझी जमीन, येरे माझ्या मागल्या, बाप माझा ब्रह्मचारी, लक्ष्मणरेषा, छत्रपती शिवाजी, बायांनो नवरे सांभाळा, महात्मा फुले व तू माझी राणी.

हिंदी चित्रपट : शीश महल, दो आँखे बारह हाथ, झनक झनक पायल बाजे, दहेज, शकुंतला, संपूर्ण रामायण, प्यारकी प्यास, तुफान और दिया, गुड्डी, लडकी सह्याद्रीकी, गुंज उठी शहनाई, आशीर्वाद, धुआँ, डॉ. कोटणीस की अमर कहानी, अर्धांगिनी, यादे, रामराज्य, शक, गृहण, दो बेहने, मौसी, स्कूलमास्टर, दो फूल, जय राधेकृष्ण, सम्राट पृथ्वीराज चौहान, अमर ज्योती, मतवाला शाहीर रामजोशी, पर्वतपे अपना डेरा, आँख की शरम, आपकी राय, मौज, शोभा, बादल, भक्त प्रल्हाद, उद्धार, नई तालीम, हिंदुस्थान हमारा, रामशास्त्री, अंधोकी दुनिया, अपना देश, जीवनयात्रा, कांचनगंगा, झलझला, झांशी की राणी, आनंद भुवन, गोपालकृष्ण, भारत मिलाप, राणी और लालपरी.

पार्श्वसंगीत दिलेले चित्रपट : तीन बत्ती चार रस्ता, परछाई, कोशिश, गीत गाया पत्थरोने, कभी अंधेरा कभी उजाला.

नाटके : पंडितराव जगन्नाथ, सीमेवरून परत जा, तानसेन, होनाजी बाळा, सौभद्र (संगीतिका), संत सखू, अवघी दुमदुमली पंढरी, गीत गाती ज्ञानेश्वर, शाबास बिरबल शाबास, मृत्युंजय (शेवटचे संगीत)

गुजराती : मोटी बा, अयोध्येचा राजा, संत ज्ञानेश्वर, धर्मात्मा (जुना), अमर ज्योती, अमृत मंथन, शेजारी.

इंग्रजी : अवर इंडिया (पॉल झील्स दिग्दर्शित)

अमुचे निशाण

चढवू गगनि निशाण अमुचे, चढवू गगनि निशाण
कोटि मुखांनी गर्जू जयजय स्वतंत्र हिंदुस्थान !

निशाण अमुचे मनःक्रांतिचे
समतेचे अन् विश्वशांतिचे
स्वस्ति चिन्ह ये युगायुगाचे ऋषिमुख–तेज महान्

मूठ न सोडू जरि तुटला कर
गाऊ फासहि आवळला जर
ठेवू निर्भय ताठ मानही झाले जरि शिर्काण

पाडू शस्त्रास्त्रांचा पाऊस
आम्ही प्रल्हादाचे वारस
सत्य विदारक आणू भूवर दुभंगून पाषाण

विराट शक्ती आम्ही वामन
वाण आमुचे दलितोद्धारण
नमशू बळिचा किरीट उद्धत ठेवुनि पादत्राण

हिमालयासम अमुचा नेता
अजात शत्रू आत्मविजेता
नामे त्याच्या मृत्युंजय हे चढवू वरति निशाण

–बा. भ. बोरकर

संगीत : **वसंत देसाई**

आई

आई माझा गुरु, आई कल्पतरु
सुखाचा सागरू आई माझी
प्रीतीचे माहेर मांगल्याचे सार
अमृताची धार आई माझी

—साने गुरुजी

अंगाई

नीज नीज माझ्या बाळा करू नको चिंता
काळजी जगाची साऱ्या आहे भगवंता !
अंगावर पांघरूण घेऊनिया काळे
देवाजीच्या मांडीवर ब्रह्मांड झोपले
लाख चांदण्याचे डोळे उघडे ठेवून
जगाचा तो पीता बैसे जागत अजून !
ज्याने मांडियला सारा विश्वाचा हा खेळ
तोच चालवील त्याला तोच सांभाळील !
झोपली पाखरे रानी झोपली वासुरे
घरोघरी झोपी गेली आईची लेकुरे !
नको जागू झोप आता पुरे झाली चिंता
काळजी जगाची साऱ्या आहे भगवंता !

श्यामची आई
संगीत : **वसंत देसाई**

ऋणनिर्देश

संदर्भ

१)	कऱ्हेचे पाणी	आचार्य अत्रे
२)	मठगावचा शिलालेख आणि सामंत राजवंशाचा इतिहास	रा. ब. वासुदेवराव बांबर्डेकर
३)	दाभोली मठाचा इतिहास	श्री. नाईक
४)	कुडाळदेशकर, खंड १ ते ३	श्री. आजगांवकर
५)	गौडब्राह्मण विशेषांक	२६ जानेवारी १९७३
६)	परूळे दर्शन (विशेषांक)	२ नोव्हेंबर १९७४
७)	वृत्तपत्रांतील लेख	(सकाळ, महाराष्ट्र टाईम्स, नवशक्ती)

मुलाखती : श्रीमंत मोतीरामशेठ ना. देसाई टोपीवाले, आना देसाई, भाई देसाई, सदानंद देसाई, नरहरी तात्या देसाई, बाळ देशपांडे, नाशिक व श्री. जयस्वाल मुंबई

सोनवड्याहून कोल्हापुरांत

किशोर : **वसंत**

कोल्हापुराहून पुण्यात

वसंत : (तारुण्याच्या उंबरठ्यावर)

नृत्य करिति तुझे सूर,
भरुनि भरुनि येइ ऊर,
तान-लय निकुंजिं चूर,
राम इंद्रनील शाम!

—भा. रा. तांबे



वसंत देसाई १९७५

प्रकाशक : संतोष जी. आजगावकर, कोंकण मराठी डायलेक्ट्स् रिसर्च इन्स्टीटयूट,
२५ के. बी. निवास, गिरगांव, मुंबई ४ * मुखपृष्ठ : सर्वोदय प्रिन्टर्स, मुंबई ४

मूल्य १ रुपया